RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक


https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१९६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.३० ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## मी शिवरायांच्या चरणांवर डोकं ठेवून माफी मागतो, माझे संस्कार वेगळे आहेत : पीएम मोदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मुंबई**

पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदराच्या भूमिपूजनासाठी महाराष्ट्रामध्ये आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणमधील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवराय यांचा पुतळा कोसळल्याने मी शिवरायांच्या चरणावर डोकं ठेवून माफी मागतो, अशा शब्दांमध्ये प्रतिक्रिया दिली. मोदी यांनी शिवभक्तांची सूद्धा माफी मागितली.माझे संस्कार वेगळे आहेत असे म्हणत पीएम मोदी यांनी माफी मागण्यासाठी तयार असल्याचे मोदी म्हणाले. सावरकरांचा अपमान करूनही माफी मागत नसलेल्यांपैकी मी



नाही. माझे संस्कार वेगळे आहेत, असे पीएम मोदी म्हणाले.

पीएम मोदी म्हणाले की, मला पंतप्रधानपदाचा उमेदवार निश्चित केल्यानंतर मी रायगड किल्ल्यावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीसमोर जाऊन प्रार्थना केली होती. एक भक्त आपल्या आराध्य दैवताची प्रार्थन करतो, तशी मी राष्ट्रसेवेच्या यात्रेला प्रारंभ केला होता. काही दिवसांपूर्वी सिंधुदुर्गात जे काही घडलं ते माझ्यासाठी आणि माझ्या सहकाऱ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज फक्त एक नाव नाही, फक्त एक राजा नाही, तर शिवाजी महाराज आमच्यासाठी आराध्य दैवत आहेत. आज मी मस्तक झुकवून मी माझं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची त्यांच्या पायावर मस्तक ठेवून माफी मागतो.

**आमचे संस्कार वेगळे आहेत**

ते पुढे म्हणाले की, आमचे संस्कार वेगळे आहेत. आम्ही जे लोक नाही, जे या भूमीचे सुपूत्र वीर सावरकरांना अपमानित करतो, शिव्या देतात. देशभक्तांच्या भावना चिरडतात. तरीही वीर सावरकरांना शिव्या देऊनही माफी मागायला जे तयार नाहीत, ते न्यायालयात लढाई लढायला तयार आहेत. देशाच्या एवढ्या महान सुपूत्राचा अपमान करून ज्यांना पश्चाताप होत नाही, महाराष्ट्राच्या जनतेने त्यांचे संस्कार ओळखावेत. मी आज महाराष्ट्रात आल्यावर सर्वात पहिले छत्रपती शिवाजी महाराजांची माफी मागण्याचे काम करत आहे. या घटनेमुळे ज्यांच्या भावना दुखावल्या आहेत, त्या शिवप्रेमींचीही मी माफी मागतो. माझे संस्कार वेगळे आहेत. आमच्यासाठी आमच्या आराध्य दैवताशिवाय काहीही मोठे नाही, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

## ड्रायव्हरने फक्त ८ तास ड्रायव्हिंग करावे लवकरच नियम येणार; नितीन गडकरींची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

पेट्रोल डिझेल संदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मोठं वक्तव्य केलेय. अमरावती येथील ड्रायव्हिंग स्कूलच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. देशातून पेट्रोल आणि डिझेल संपवण्याचा मी संकल्प केला असल्याचे नितीन गडकरी यांनी केला आहे. यावेळी बोलताना त्यांनी रस्ते अपघातामध्ये दरवर्षी मृत्यू पावणाऱ्यांबद्दल आणि त्याच्याबाबतच्या कारणावरही त्यांनी भाष्य केले.

भारतामधून येणाऱ्या काळात पेट्रोल डिझेल हद्दपार करणार आहे. तसा मी संकल्प केला आहे. येणाऱ्या काळात वाहतूक पद्धतीत ही बदलत जाणार आहे. मेळघाट सारख्या परिसरात ड्रायव्हर ट्रेनिंग सेंटर सुरू होणं गरजेचे आहे...



देशात ड्रायव्हरची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. येणाऱ्या काळात ड्रायव्हरने फक्त आठ तास ड्रायव्हिंग करावे असा नियम करणार असल्याचेही यावेळी गडकरी म्हणाले.

आपल्या देशात साडेचार कोटी रोजगार देणारी ऑटोमोबाईल इंडस्ट्री आहे. यामध्ये दिवसागणिक वाढ होत आहे. येणाऱ्या काळात ऑटोमोबाईल इंडस्ट्रीमध्ये भारत जगात पहिला क्रमांकावर जाईल, असा विश्वास गडकरींनी यावेळी व्यक्त केला.

देशात शेतकऱ्यांना समृद्ध करण्याकरता इथेनॉल पॉलिसी आणली, ही इकॉनॉमी दोन लाख कोटींवर पोहोचली आहे.येणाऱ्या काळात ट्रान्सपोर्ट सेक्टर बदलत चालले असून इलेक्ट्रिक व्हेईकल व इथून वर चालणारे वाहन रस्त्यावर धाव लागतील.ज्यावेळी मुंबई-पुणे महामार्ग बांधण्याची मला संधी मिळाली. दोन तासांत जाता येईल, असे सांगितले होते. त्यावर माझी खिल्ली उडवली गेली. पण तुम्ही वास्तव पाहत आहात. लोक दोन तासांत मुंबईवरुन पुण्याला जाऊ शकता. देशात आशाप्रकारचे अनेक रस्ते तयार केले आहेत. काश्मीर ते कन्याकुमारी हा रस्ता तयार केलाय. त्यामध्ये जोडरस्ते तयार केले आहेत. महाराष्ट्रासह अनेक राज्यांना याचा फायदा होणार आहे.भारतामध्ये लवकरच ४०० इथेनॉल पंप सुरू करण्याची योजना आहे. इथेनॉल वापरामुळे ट्रान्सपोर्ट स्वस्त होईल, असेही गडकरी यावेळी म्हणाले.येणाऱ्या काळात वाहन चालकांना व्यवस्थित परीक्षा घेऊन त्यांना लायसन देण्यात यावं, लायसन देण्यात फ्रॉड होऊ नये एका ड्रायव्हरवर अनेकांचं जीवन अवलंबून असते, असेही गडकरी म्हणाले.

## देवेंद्र फडणवीस 'नदी जोड प्रकल्पांना' गती देणार, दुष्काळी भागाची चिंता मिटणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मुंबई**

महाराष्ट्र हे मजबूत औद्योगिक आणि कृषी क्षेत्रासाठी ओळखले जाते. राज्यात ऊस, कापूस, केळी, ज्वारी, बाजरी, डाळिंब, संत्रा, सोयाबीन, तांदूळ, वाटाणा, कांदा, फळे आणि भाजीपाला यासह विविध प्रकारच्या पिकांची लागवड केली जाते. मात्र, महाराष्ट्रातील विविध भागात सिंचनाच्या अपुऱ्या सुविधांचा सामना करावा लागतोय. या अडचणींचा सामना करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गती देणार आहेत.

दरम्यान, राज्यातील सिंचनाची समस्या सोडवण्यासाठी देवेंद्र फडणवीस हे कटिबद्ध होते. २०१९ मध्ये त्यांनी नदी जोड प्रकल्पासाठी गुजरातकडून मदत घेण्यास नकार दिला होता. हा प्रकल्प महाराष्ट्र स्वतंत्रपणे पूर्ण करेल असे त्यांनी सांगितले होते. मात्र, महाराष्ट्रात युतीचे सरकार आल्यावर प्रगती मंदावल्याचे चित्र दिसत आहे.

धुळे, नंदुरबार, जत, कवठेमहांकाळ, आटपाडी, सोलापूर, माण, खटाव, धाराशिव, लातूर, पश्चिम विदर्भ आदी भागांना दीर्घकाळापासून



पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पुरेशा सिंचनाअभावी स्थलांतर आणि शेतकरी आत्महत्या या भागात अनेकदा दिसून येतात. शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि जीवनमान सुधारण्यासाठी या दुष्काळी भागात पुरेसे सिंचन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

पुरेशा सिंचनाअभावी स्थलांतर आणि शेतकरी आत्महत्येच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि जीवनमान सुधारण्यासाठी या दुष्काळी भागात पुरेसे सिंचन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. पाणीटंचाईची आव्हाने अनेक वाहत्या नद्या असूनही महाराष्ट्राला पाण्याची गंभीर समस्या भेडसावत आहे. उदाहरणार्थ, गोदावरी नदीचा उगम नाशिकमधून होतो परंतु नाशिक, जळगाव आणि धुळे जिल्ह्यांना पुरेसा पाणीपुरवठा होत नाही.

## जितेश अंतापूरकर आणि झिशान सिद्दीकी यांची काँग्रेसमधून हकालपट्टी - नाना पटोलेंची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० नागपूर**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून काँग्रेसनं त्यांच्या पक्षातील २ आमदारांवर मोठी कारवाई केली आहे. जितेश अंतापूरकर आणि झिशान सिद्दीकी यांची काँग्रेसमधून हकालपट्टी करण्यात आल्याची माहिती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. त्यामुळे जे काँग्रेसमध्ये नाहीत त्यांचा चर्चेचा मुद्दा होऊ शकत नाही असंही पटोलेंनी स्पष्ट केले.

गेल्या अनेक दिवसांपासून जितेश अंतापूरकर आणि झिशान सिद्दीकी यांच्या नावांची चर्चा होती. विधान परिषदेत काँग्रेसच्या काही आमदारांनी क्रॉस व्होटिंग केले होते. त्यात महायुतीला फायदा झाला होता. यावेळी पटोलेंनी ज्या आमदारांनी क्रॉस



व्होटिंग केले त्यांची नावे आम्हाला माहिती झाली आहे. हायकमांडकडे या नावांची यादी पोहचली असून त्यांच्यावर पक्ष कारवाई करेल असा इशारा दिला होता. त्यातच आज सकाळी जितेश अंतापूरकर यांनी पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. जितेश अंतापूरकर हे भाजपात प्रवेश करतील अशी शक्यता वर्तवली जात होती.

नागपूर येथे पत्रकारांनी जितेश अंतापूरकर यांच्या बाबतीत प्रश्न विचारला असताना नाना पटोलेंनी अंतापूरकर आणि सिद्दीकींची पक्षातून हकालपट्टी झाल्याचं विधान केले तेव्हा पक्षातून या आमदारांवर कारवाई झाल्याचं उघड झालं. झिशान सिद्दीकी हे वांद्रे पूर्व मतदारसंघातील काँग्रेसचे आमदार होते. परंतु नुकत्याच झालेल्या अजित पवारांच्या जनसन्मान यात्रेवेळी झिशान सिद्दीकी यांनी त्यांचे स्वागत केले, मतदारसंघात यात्रेत सहभागी झाले त्यावरून ते अजित पवारांच्या राष्ट्रवादीत जाणार हे जवळपास निश्चित झालं होते. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या काही आमदारांचं तिकीट कापले जाणार असं बोलले जात होते. त्यात जितेश अंतापूरकर, झिशान सिद्दीकी यांच्याही नावाचा समावेश होता. जितेश अंतापूरकर हे अशोक चव्हाण यांचे समर्थक मानले जातात. चव्हाण यांनी काँग्रेसचा हात सोडून भाजपात प्रवेश केला तेव्हापासून अंतापूरकर भाजपात जातील अशी चर्चा होती. त्याला आज त्यांच्या काँग्रेसमधील राजीनाम्याने दुजोरा मिळाला. तर झिशान सिद्दीकी यांनी पक्षातील नेत्यांविरोधात उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. महाविकास आघाडीत असूनही वांद्रे पूर्व मतदारसंघावर उद्धव ठाकरेंचा डोळा होता. ठाकरेंच्या दबावामुळे काँग्रेस नेत्यांकडून मला डावललं जात असल्याचा आरोप त्यांनी केला होता. त्यात आता काँग्रेसनं या दोन्ही आमदारांची हकालपट्टी केल्यानं ते लवकरच दुसऱ्या पक्षात अधिकृत प्रवेश करतील असं बोललं जातं.

## मंत्रिमंडळात तानाजी सावंत माझ्या बाजूला बसतात, त्यांना उलटी करताना मी कधी बघितले नाही: धर्मराव बाबा आत्राम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० नागपूर**

राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी राष्ट्रवादी बाबतीत केलेल्या विधानामुळे मोठी खळबळ माजली आहे. राष्ट्रवादीसोबत आपले कधीच पटले नाही. कॅबिनेटमध्ये मांडीला मांडी लावून बसलो असलो तरी बाहेर आलं की उलट्या होतात. असे विधान तानाजी सावंत यांनी केलं. तानाजी सावंत यांच्या या वक्तव्यामुळे राष्ट्रवादी बद्दल त्यांची नाराजी उघडपणे दिसून येतेय.

दरम्यान तानाजी सावंत यांची ही वायरल क्लिप नेमकी कधीची आहे याबाबतीत सध्या कोणतीही माहिती उपलब्ध नाही. तसेच यांच्या सत्यतेबद्दल ही एबीपी माझा पुष्टी करत नाही. मात्र याच वक्तव्यावरुन आता अजित पवार गटाच्या नेत्यांकडून प्रतिक्रिया उमटताना दिसत आहे. मंत्रिमंडळात तानाजी सावंत माझ्या बाजूला बसतात, त्यांना उलटी करताना मी कधी बघितले नाही. तानाजी सावंत यांचे हे व्यक्तिगत मत असल्याची प्रतिक्रिया राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री आणि गोंदियाचे पालकमंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी दिली आहे.

**अनिल देशमुख यांच्या विरोधात आम्ही सक्षम उमेदवार देणार**


उपमुख्यमंत्री अजित पवार हे उद्या ३१ ऑगस्टला नागपुरात येत आहेत. दरम्यान त्यांची काटोलमध्ये सभा आयोजित करण्यात आली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने काटोलवर दावा करण्याचा विषय नाही, काटोल राष्ट्रवादीची जागा आहेच, ती आम्ही मागणारच. किंबहुना अनिल देशमुख यांच्या विरोधात आम्ही तिथे उमेदवार देणार. अहेरी येथेही अजित पवार येणार आहेत. ज्या जागा राष्ट्रवादीच्या आहेत त्यावर आमचे उमेदवार असणारच आहेत. अनिल देशमुख यांच्या विरोधात आम्ही सक्षम उमेदवार देणार आहोत. मात्र तो उमेदवार नेमकं कोण हे महायुती ठरवेल. तर काही ठिकाणी अदलाबदली होऊ शकते असे मत मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी बोलताना व्यक्त केलं आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना न्यायालयाची तंबी, म्हणाले उत्तर द्या, नाहीतर योग्य आदेश द्यावे लागतील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नागपूर**

नगरविकास विभागाचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एका प्रकरणात जबाब नोंदवण्याचे आदेश दिले होते. मात्र मुख्यमंत्र्यांनी जबाब नोंदवला नाही तसेच मुदत वाढवून देण्यासाठी विनंतीदेखील केली नाही. त्यामुळे तीन आठवड्यात उत्तर द्या, नाहीतर योग्य आदेश द्यावे लागतील, अशा शब्दात न्यायालयाने मुख्यमंत्र्यांसह नगरविकास विभागाचे प्रधान सचिव आणि यवतमाळचे जिल्हाधिकारी यांना तंबी दिली.

याचिकाकर्ते पांडुरंग टोंगे यांची एक याचिका निकाली काढत वणीमधील बेकायदेशीररित्या ताब्यात घेतलेल्या १६० दुकानांना रिकामे करून त्यांचा लिलाव करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. यानंतर नोव्हेंबर २०१४ मध्ये यवतमाळच्या जिल्हाधिकाऱ्यांनी वणी नगरपालिकेला याबाबत आदेश दिले. दुकानदारांनी याविरोधात एका तत्कालीन राज्यमंत्र्यांकडे तक्रार केली. यानंतर राज्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला स्थगिती देत संबंधित दुकानांना ३० वर्षांसाठी राज्य शासनाला भाडेतत्त्वावर देण्याचा प्रस्ताव देण्यास सांगितले. टोंगे यांनी राज्यमंत्र्यांच्या या निर्णयाला २०१६ मध्ये उच्च न्यायालयात आव्हान दिले.



उच्च न्यायालयाने याप्रकरणी अंतरिम स्थगिती दिली व याप्रकरणी राज्यमंत्र्यांनी कायदेशीर सुनावणी घेत नव्याने निर्णय घेण्याच्या सूचना केल्या. २०१९ साली राज्यमंत्र्यांनी सुनावणी घेत नगरपालिकेला संबंधित दुकाने तात्काळ रिकामी करून ई-टेंडर प्रक्रियेच्या माध्यमातून लिलाव करण्याचे आदेश दिले. तत्कालीन राज्यमंत्र्यांच्या या आदेशाला गांधी चौक गोलधारक या दुकानदारांच्या संघटनेने उच्च न्यायालयात आव्हान दिले. २०२२ मध्ये उच्च न्यायालयाने लिलाव प्रक्रिया पुढे न राबवण्याचा अंतरिम आदेश दिला होता. यानंतर संघटनेच्यावतीने याचिका परत घेण्यात आली. यानंतर १५ मार्च २०२४ रोजी या प्रकरणाशी काहीही संबंध नसताना आमदार राजकुमार पटेल यांनी मुख्यमंत्र्यांना लिलाव प्रक्रिया थांबवण्याची विनंती केली. मुख्यमंत्र्यांनी कुठलेही स्पष्ट कारण न देता लिलाव प्रक्रिया थांबवण्याचे आदेश दिले. राज्यशासनाकडे फेरविचार याचिका प्रलंबित असताना व मुख्यमंत्र्यांच्या अधिकारक्षेत्रात येत नसतानाही त्यांनी हा निर्णय घेतल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. या याचिकेवर पुढील सुनावणी २५ सप्टेंबर रोजी होणार आहे.

**काय म्हणाले न्यायालय?**

१४ ऑगस्ट रोजी न्यायालयाने मुख्यमंत्र्यासह सर्व प्रतिवादींना जबाब नोंदविण्याचे आदेश दिले होते. नागपूरच्या सरकारी वकील कार्यालयाच्या माध्यमातून पाठविलेल्या नोटिसला मुख्यमंत्र्यांनी जबाब दिला नाही. आता जर याप्रकरणी जबाब नोंदविण्यात आला नाही तर याचिकाकर्त्यांने केलेले आरोपांवर मुख्यमंत्र्यांना आक्षेप नाही असे समजून योग्य न्यायालयीन आदेश दिले जातील , असे न्यायालयाने निर्णयात स्पष्ट केले.

## संपादकीय ......

# शाळा प्रशासनाने जागे राहावे

घटना ऐकल्यानंतरच तळपायाची आग मस्तकात जावी इतका संतापजनक प्रकार बदलापूरच्या शाळेत चिमुकल्यांच्या बाबतीत घडला आहे. या प्रकरणामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे. या घटनेने पालक, शिक्षक आणि समाजात भीती आणि अस्वस्थता पसरली आहे. शाळा हे विद्यार्थ्यांसाठी केवळ शिक्षणाचे केंद्र नसून ते त्यांच्यासाठी सुरक्षित ठिकाण असावे हे लक्षात घेता बदलापूरमधील ही घटना अत्यंत गंभीर आहे. ही घटना भारतातील एकमेव आहे असेही नाही.

बाललैंगिक अत्याचाराच्या घटनांचे प्रमाण वाढत असल्याचे नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या अहवालावरून दिसून येते. अलीकडचा अहवाल उपलब्ध नसला तरी २०२१ मध्ये भारतात एकूण ४८ हजार ८९ घटना पोक्सो अंतर्गत नोंदवण्यात आल्या. हा आकडा २०२० मधील ४७ हजार २२१ घटनांच्या तुलनेत वाढ दर्शवतो. भारतामध्ये २०१२ मध्ये 'प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन फ्रॉम सेक्सुअल ऑफेन्सेस अ‍ॅक्ट' (पोक्सो) कायदा लागू झाला, ज्यामुळे बाललैंगिक अत्याचाराच्या घटनांची नोंद आणि न्याय प्रक्रिया अधिक प्रभावी झाली, परंतु तरीही या प्रकारच्या गुन्ह्यांची संख्या चिंताजनक पातळीवर आहे.खरेतर पोक्सो कायद्याशिवाय २०१३ च्या क्रिमिनल लॉ अमेंडमेंट अ‍ॅक्टद्वारे कठोर शिक्षा आणि त्वरित न्याय प्रक्रिया लागू करण्याची तरतूद केली आहे. या कायद्यांच्या अंतर्गत मुलांवरील लैंगिक अत्याचार करणार्यांना कठोर शिक्षा दिल्या जातात, ज्यात फाशीची शिक्षादेखील समाविष्ट आहे, तथापि या कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासनिक आणि न्यायिक प्रक्रियेत सुधारणा आवश्यक आहे. म्हणूनच त्वरित तक्रार नोंदणी, तपास आणि न्याय प्रक्रिया अधिक जलद आणि प्रभावी होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला शाळेत सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. सुरक्षेच्या बाबी शाळा सुरू होतानाच तपासणे गरजेच्या आहेत, परंतु आपल्याकडे बदलापूरसारखी विदारक घटना घडते आणि त्यानंतर शिक्षण व्यवस्थेला जाग येऊन ते राज्यस्तरीय समिती वगैरे स्थापन करण्याच्या हालचाली करतात. प्रत्यक्षात घटना घडून काही दिवस उलटले की पहिले पाढे पंचावन्न. बदलापूर घटनेतील प्रमुख आरोपी हा कंत्राटी कर्मचारी आहे. कंत्राटी पद्धतीवर कर्मचारी नियुक्त करण्याचे धोरण शासनाचेच आहे. त्यामुळे या घटनेला शासनही तितकेच जबाबदार आहे.

सर्वच कंत्राटी कर्मचारी वाईट वृत्तीचे असतात असे मुळीच नाही, पण जेव्हा कोणत्याही क्षेत्रात कायम सेवेत कर्मचार्यांना घेतले जाते त्यावेळी कर्मचार्यांची इत्थंभूत माहिती संबंधित संस्थांकडे असते, परंतु कंत्राटी कर्मचार्यांच्या बाबतीत तितकी काळजी घेतली जात नाही. त्यातून गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांचीही नियुक्ती होण्याचा धोका असतो. बदलापूर प्रकरणाच्या माध्यमातून स्पष्ट झाले की शाळांमध्ये सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी आहेत, ज्याचा फटका निरपराध विद्यार्थ्यांना बसत आहे. या पार्श्वभूमीवर शाळा व्यवस्थापनाने शाळेच्या परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था असावी याची खात्री करणे आवश्यकच आहे.

ज्यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, योग्य प्रकाशयोजना आणि सुरक्षा कर्मचार्यांची नियुक्ती असावी. पालकांनादेखील त्यांच्या मुलांच्या सुरक्षिततेबाबत शाळांशी सतत संवाद साधण्याची आवश्यकता आहे. अनेकदा पालकांना त्यांच्या मुलांच्या सुरक्षेबद्दल असलेला धोका स्पष्टपणे कळत नाही किंवा त्यांच्यावर आवश्यक तो विश्वास ठेवला जातो, ज्यामुळे असे गंभीर प्रसंग घडू शकतात. पालकांनी आपल्या मुलांच्या शाळेतल्या दैनंदिन जीवनावर लक्ष ठेवायला हवे आणि त्यांना सुरक्षेबाबत जागरूक करायला हवे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत शिक्षकांची जबाबदारीदेखील मोठी आहे.

विद्यार्थ्यांना त्यांच्याशी होणार्या कोणत्याही प्रकारच्या गैरवर्तनाबद्दल बोलता येईल असे वातावरण तयार करायला हवे, जेणेकरून अशा घटना लवकरच समोर येतील आणि त्यावर कारवाई होईल. शाळा आणि पालकांमध्ये नियमित संवाद असावा, ज्याद्वारे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नांवर चर्चा करता येईल. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कडक धोरणे आणि नियम बनवणे आवश्यक आहे, ज्यामुळे शाळेतील सुरक्षितता सुनिश्चित होईल. अशा धोरणांमध्ये संभाव्य धोका ओळखून त्वरित प्रतिसाद देण्याची क्षमता असावी. त्यावर तेथील पदाधिकार्यांनी बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज आहे.

शाळेतील सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यासाठी सरकारच्या पातळीवरही कठोर उपाययोजना गरजेच्या आहेत. शालेय सुरक्षा धोरणे, नियम आणि सुरक्षा व्यवस्थांचे नियमित परीक्षण होणे आवश्यक आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला कोणताही धोका निर्माण होणार नाही. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी सर्व स्तरावर तातडीने आणि निर्णायक पावले उचलण्याची गरज आहे. शाळा, पालक, शिक्षक आणि सरकारने एकत्रितपणे काम करून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वातावरण तयार करायला हवे, जेणेकरून अशा दुर्दैवी घटनांना आळा घालता येईल.

# खादी ग्रामोद्योग मंडळाच्या या नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी तुमच्या गावाला मिळू शकते ५६ लाखांचे अनुदान

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक**

मधमाश्यांच्या वसाहतीचे जतन व संवर्धन करण्याची आवश्यकता ओळखून महाराष्ट्रखादी ग्रामोद्योग मंडळाच्या मध संचलनालयाने मधाचे गाव हा नावीन्यपूर्ण उपक्रम राज्यात सुरू केला आहे.



गावकऱ्यांना 'मधाचे बोट'

मधमाशीपालन हा राज्यातील एक महत्त्वाचा जोडधंदा होऊ पाहत आहे. मधमाश्या या केवळ मध आणि मेणच देत नाहीत, तर त्या परागीकरणामुळे शेती पीक उत्पादनात ३५ ते ४० टक्के वाढ करतात.बदलत्या काळात आयुर्वेदिक उपचार, औषधी सौंदर्यप्रसाधने, वजन कमी करणे, पोषक आहार आदींमध्ये मधाचा वापर प्रचंड वाढत आहे. परागीभवन, पुनरुत्पादन व जैवविविधता टिकवण्यासाठी मधमाशी महत्त्वाची भूमिका बजावते. यामुळे हा प्रकल्प महत्वाचा आहे.

## काय आहेत या मोहीमेचे वैशिष्ट्ये

– राज्यातील वनसंपदा, फुलशेती, पीक उत्पादने, नैसर्गिक फुलोरा व मधमाश्या पालन करणारे शेतकरी, मधपाळ या घटकांचा अभ्यास करून मधाच्या गावांची निवड करणे.

– संपूर्ण साखळी म्हणजे मधमाश्यांना पोषक असे वृक्ष, वनस्पतीच्या लागवडीपासून मधमाश्या पालनासह मध संकलन, मध प्रक्रिया, बँडिंग व पॅकिंग करून मध व मधमाश्यांपासून तयार होणाऱ्या उप उत्पादनांच्या विक्रीची व्यवस्था करणे

– तसेच या उत्पादनापासून तयार होणाऱ्या अन्य उत्पादकांच्या उद्योगांना प्रोत्साहन देणे, ग्रामीण भागातील तरुण उद्योजकांना मधमाश्या पालनाकडे वळवणे व कायमस्वरूपी रोजगार निर्माण करणे.

– मधमाशी संवर्धन, पालन त्यातून शेती उत्पन्न वाढ यांसह गाव हा लाभार्थी घटक म्हणून विकसित करणे ही मधाचे गाव योजनेची वैशिष्ट्ये आहेत.

निसर्गाच्या सान्निध्यात हवे गाव

– निसर्गाच्या सान्निध्यात पर्यटनास अनुकूल असलेले गाव असावे.

– शासनाच्या विविध योजना यशस्वीपणे राबविणारे गाव असावे.

– गावामध्ये भौगोलिकदृष्ट्या मधमाश्यांना पूरक असणारी शेती पिके, वनसंपदा, मुबलक फुलोरा खाद्य असावे.

– जंगल भागातील गावाला प्राधान्य, गावात मधाचे संकलन व व्यवसाय करणारे नागरिक, शेतकरी असावेत.

– मधाचे गाव हा नवीन उपक्रम राबवताना लाभार्थी गावांची द्विरुक्ती होऊ नये याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत समिती

नैसर्गिक संसाधनाची विपुलता आणि विविधता असलेल्या महाराष्ट्राला मध क्षेत्रात देशातील अग्रणी राज्य बनवण्याची संधी आहे. त्यासाठी राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने ही संकल्पना राबवली आहे.

गावची शिफारस जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने करणे आवश्यक आहे. ५६ लाखांचे अनुदान या योजनेसाठी मिळणार आहे.

# फुलशेती करताय ह्या नवीन तंत्रज्ञानामुळे वाढू शकतं तुमचं उत्पन्न

**दि.३० इदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्रातील फुलांची परंपरा खूप जुनी आहे. फुलांचे सौंदर्य, सुगंध आणि त्यांचे धार्मिक व सांस्कृतिक महत्व यामुळे फुलांची लागवड महाराष्ट्रात महत्त्वाची मानली जाते. फुलांच्या व्यवसायात यशस्वी होण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर, चांगले मार्केटिंग, आणि हवामानाच्या बदलांचा विचार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील फुलांच्या विक्रीचे वार्षिक उत्पन्न हे खूप मोठे आहे. शेतकऱ्यांनी फुलांच्या लागवडी मुळे सुमारे १० लाख रुपये वार्षिक उत्पन्न मिळवले आहे. हे उत्पन्न फुलांच्या विविध प्रकारांच्या विक्रीतून मिळते, जसे की झेंडू, गुलाब, मोगरा, आणि कमळ.

**विक्रीचे फायदे**

**१) आर्थिक उत्पन्न**

फुलांच्या विक्रीमुळे शेतकऱ्यांना आणि उद्योजकांना चांगले आर्थिक उत्पन्न मिळते. फुलांची मागणी नेहमीच असते, त्यामुळे विक्रीतून नफा मिळण्याची शक्यता जास्त असते.

**२) रोजगार निर्मिती**

फुलांच्या व्यवसायामुळे अनेक लोकांना रोजगार मिळतो. फुलांच्या लागवड, तोडणी, पॅकिंग, आणि विक्री या सर्व प्रक्रियांमध्ये अनेक लोकांना काम मिळते.

**३) पर्यावरणीय फायदे**

फुलांच्या लागवडीमुळे पर्यावरणाला फायदा होतो. फुलांच्या झाडांमुळे हवेतील प्रदूषण कमी होते आणि जैवविविधता वाढते.


**धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व**

**१) सण आणि उत्सव**

गणेशोत्सव, दिवाळी, होळी, मकरसंक्रांत, आणि नवरात्रोत्सव यांसारख्या सणांमध्ये फुलांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. गणेशोत्सवात गणपतीच्या मूर्तीची सजावट फुलांनी केली जाते. दिवाळीत घराची सजावट फुलांच्या तोरणांनी केली जाते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**२) विवाह आणि धार्मिक विधी–** विवाह सोहळ्यात फुलांची सजावट खूप महत्त्वाची असते. वरमाला, मंडप सजावट, आणि पूजा विधींमध्ये फुलांचा वापर केला जातो. धार्मिक विधींमध्ये फुलांचा वापर देवतांना अर्पण करण्यासाठी केला जातो.


फुलशेतीचं नवं रूप

**३) सांस्कृतिक कार्यक्रम**

सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये फुलांची सजावट वातावरणाला एक विशेष आकर्षण देते. नृत्य, नाटक, आणि संगीत कार्यक्रमांमध्ये फुलांचा वापर केला जातो.

**लागवडीचे फायदे**

**१) आर्थिक उत्पन्न:** फुलांची मागणी नेहमीच असते, त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला फायदा होतो.

२) पर्यावरणीय फायदे : फुलांच्या लागवडीमुळे पर्यावरणाला फायदा होतो. फुलांच्या झाडांमुळे हवेतील प्रदूषण कमी होते आणि जैवविविधता वाढते. सौंदर्य आणि आनंद: फुलांच्या लागवडीमुळे परिसराचे सौंदर्य वाढते. फुलांच्या सुगंधामुळे मनाला आनंद मिळतो.

फुलांच्या व्यवसायाचे प्रकार

**१) फुलांची शेती**

गुलाब, मोगरा, झेंडू, कमळ यांसारख्या फुलांची शेती करून शेतकरी चांगले उत्पन्न मिळवू शकतात. फुलांची शेती ही कमी खर्चात आणि कमी जागेत करता येते.

**२) फुलांची विक्री**

फुलांची विक्री ही थेट बाजारात किंवा ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर करता येते.

**तंत्रज्ञानाची ओळख –** फुलांच्या डिझाइन तंत्रज्ञानाने फुलांच्या सजावटीला एक नवीन उंचीवर नेले आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने विविध प्रकारच्या फुलांच्या सजावटीचे नमुने तयार केले जातात, ज्यामुळे कोणत्याही कार्यक्रमाची शोभा वाढते.

– फुलांच्या डिझाइन तंत्रज्ञानामुळे फुलांच्या सजावटीत नवनवीन कल्पना आणता येतात

– या तंत्रज्ञानाच्या मदतीने फुलांच्या सजावटीत अचूकता, विविधता आणि स्वयंचलितता आणता येते. त्यामुळे फुलांच्या डिझाइन तंत्रज्ञानाचा वापर करून कोणत्याही कार्यक्रमाची शोभा वाढवता येते.

**फुलाच्या डिझाइन तंत्रज्ञानाचे प्रकार**

**१) थ्री-डी प्रिंटिंग**

थ्री-डी प्रिंटिंगच्या मदतीने फुलांच्या डिझाइनमध्ये विविधता आणता येते. या तंत्रज्ञानामुळे फुलांच्या आकारात आणि रंगात विविधता आणता येते.

**२) कंप्युटर-एडेड डिझाइन (सीएडी)**

सीएडी तंत्रज्ञानाच्या मदतीने फुलांच्या डिझाइनचे अचूक नमुने तयार करता येतात. यामुळे फुलांच्या सजावटीत नवनवीन कल्पना आणता येतात.

**३) आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय)** एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने फुलांच्या डिझाइनमध्ये स्वयंचलितता आणता येते. यामुळे फुलांच्या सजावटीत वेळ आणि श्रमाची बचत होते.

**डॉ. सय्यद इलियास**
सहयोगी प्राध्यापक,
वनस्पतिशास्त्र विभाग, पूना कॉलेज, पुणे




## निरोगी राहण्यासाठी काय खावे आणि काय खावू नये?

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक**

बदलत्या लाइफस्टाइलमुळे बऱ्याच जणांना आरोग्याच्या विविध तक्रारी जाणवत आहेत. जसे की, लठ्ठपणा, डायबिटीस, रक्तदाब. त्यामुळे निरोगी आरोग्यासाठी पोषक घटक असलेले पदार्थ खाणे आणि योग्य लाइफस्टाइलनूसार फॉलो करणे आवश्यक आहे. जागतिक आरोग्य संघटना अर्थात थकज नूसार सुदृढ शरीरासाठी आहाराच्या बाबतीत काही गाईडलेन्स जारी करण्यात आल्या आहेत. आहारात कोणते पदार्थ खायला हवेत कोणते खावू नयेत यासंदर्भात माहीती देण्यात आली आहे. पाहूयात, थकज नूसार निरोगी राहण्यासाठी काय खावे आणि काय खावू नये,



थकज नूसार, निरोगी आरोग्यासाठी प्रौढ व्यक्तीच्या आहारात फळे, भाज्या, डाळी, धान्ये यांचा समावेश असायला हवा.

आहारात दररोज भाज्यांचा समावेश करायला हवा. भाज्यामध्ये आवश्यक पोषक घटक असतात.जे शरीर निरोगी ठेवण्यासाठी उपयुक्त ठरतात.

नाष्टामध्ये ताजी फळे खायला हवीत. तसेच हंगामानूसार आहारात भाज्या आणि फळांचा समावेश करायला हवा.दिवसभरात केवळ एक चमचा मीठ खायला हवे. तसेच मीठ आयोडीनयुक्त असणे आवश्यक आहे.

निरोगी राहण्यासाठी आहारात ट्रान्स फॅटचा समावेश करणे टाळायला हवे. यासाठी तुम्ही ट्रान्सफॅट असणारे पदार्थ जसे की, भाजलेले आणि तळलेले पदार्थ, फ्रोजन पिझ्झा कूकीज, बिस्कीटे , वेफर्स आदीं पदार्थ खाणे टाळायला हवे.

जे पदार्थ तुम्ही वाफवून खावू शकता, त्यासाठी तळणे टाळायला हवे.

तुपाच्याऐवजी तुम्ही आहारात पॉलिसॅच्युरेटेड तेलाचा वापर करायला हवा. यासाठी तुम्ही सोयाबीन, मका, सुर्यफूल आदी तेलाचा वापर आहारात करू शकता.

डोनेट्स आणि केक खाणे टाळायला हवे. कारण अतिसाखरेचे सेवन आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.जास्त साखरेच्या सेवनाने लठ्ठपणा आणि डायबिटीसचा धोका निर्माण होतो. त्यामुळे कार्बोनेटेड ड्रिंक्स, रेडी टू ड्रिंक चहा, फ्लेवर्ड दूध पिणे टाळायला हवे.

## आपल्या अंगावर घेणार का ?

मागील कित्येक दिवसांपासून पत्रकार, सामाजिक संस्था, अमरावती येथील प्रत्येक जण, विविध माध्यमाद्वारे अमरावती येथील एका ज्वलंत प्रश्नाबाबत प्रशासनाकडे मागणी करत आहे परंतु आजपर्यंत त्यावर कुठलीही कारवाई झाल्याचे दिसत नाही. राजापेठ पासून ते इरवीन पर्यंत पुलाखालील संपूर्ण भाग हा घुमंतू लोकांनी व्यापून टाकलेला आहे त्याबाबत व त्यामुळे होणाऱ्या नुकसान तसेच धोक्यांबाबत सर्व लोकांनी व प्रसारमाध्यमांनी प्रशासनाचेलक्षत्याकडेवेधण्याचा प्रयत्न सातत्याने केलेला आहे.

आश्चर्याची गोष्ट अशी की महानगरपालिकामधून जाणे किवा येणे करीत असताना या लोकांचा राजकमल चौकात असलेला व्याप हा प्रत्येक अधिकारी हा उघड्या डोळ्यांनी बघत आहे तसेच सिटी कोतवाली पोलीस स्टेशन समोरही हे लोक ठाण मांडून आहेत असे असतानाही प्रशासन त्यावर कुठलीही कारवाई करत नाही. कालच राजकमल चौकात मी बघितले की हिरवा लाइट लागल्याबरोबर ज्यावेळेस गाड्या निघत होत्या त्याच वेळी एक अंदाजे तीन ते चार वर्ष वयाचा घुमंतू लोकांमधील मुलगा एका गाडीसमोर येता येता वाचला. त्या ड्रायव्हरच लक्ष होतं म्हणून एक अप्रिय घटना घडली नाही. पण प्रत्येक वेळेस असे होईलच असे नाही जर चुकून एखाद वेळेस या मुलांपैकी एखादा मुलगा गाडी समोर अथवा चाकाखाली आला व अपघात घडून जखमी झाला अथवा मरण पावला तर त्या मृत्यूस अथवा घटनेस जबाबदार कोण. योग्य वेळी वारंवार लक्ष वेधूनही जर प्रशासन कारवाई करत नसेल व त्यामुळे अशी अप्रिय घटना घडत असेल तर तो अपघात नसून त्याला हत्या संबोधित करता येता येईल का व त्या हत्तेचा दोष प्रशासन आपल्या अंगावर घेईल का हा क खरा प्रश्न आहे.महानगरपालिका व पोलीस प्रशासन दोघांच्याही हे नजरेसमोर होत असलेला हा स्वैराचार प्रशासन का ई थांबवत नाहीयाचे उत्तर आजपावेतो अमरावतीकर न जनतेला मिळत नाही. आम्ही कुठल्याही लोकांच्या न विरुद्ध नाही परंतु अमरावतीकर जनतेला स्वच्छ अमरावती मिळावी तसेच अमरावतीमध्ये व सुरक्षितपणे वाहने चालवता यावी एवढी अल्प अपेक्षा अमरावतीकरांना प्रशासनाकडून आहे. रस्त्यावर ठाण मांडून बसलेल्या घुमंत लोकांची योग्य ठिकाणी सोय करून राजापेठ ते इरवीन रस्त्या हा अमरावतीकरांसाठी सुस्थितीत आणावा हीच - अपेक्षा आहे. प्रशासन म्हणून त्यांची ही जबाबदारी आहे. परंतु प्रशासन ती का पार पडत नाही याचे कारण एकतर प्रशासनाला कर्तव्य पार पाडायची इच्छा नाही किवा त्या लोकांना तिथून स्थलांतरित करण्याची त्यांची हिंमत नाही असे वाटते. कारण काहीही असले तरी दिवसेंदिवस हा प्रश्न मोठा होत चालला आहे व अमरावतीकरांच्या संयमाचा बांध फुटण्याच्या परिस्थितीत आहे. प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाने ताबडतोब यावर उपाय करावा ही अपेक्षा अन्यथा अमरावतीकर केव्हा रस्त्यावर येतील याचा नेम नाही. आधीच सांगितल्याप्रमाणे. जर प्रशासनाच्या अशा निष्काळजी पणामुळे जर एखादा मृत्यू झाला तर त्या हत्ये ची जबाबदारी प्रशासन स्वतःच्या अंगावर घेणार का?



**ॲड. प्रशांत देशपांडे**

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ३० ऑगस्ट २०२४ शहर/ग्रामिण


# ‘ट्रायबल’च्या वरिष्ठ संशोधन अधिकारीपदाची भरती रखडली

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून ‘मॅट’मध्ये बाजू मांडण्यास विलंब

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने आदिवासी विकास विभागातील वरिष्ठ संशोधन अधिकारी पदाच्या चाळणी परीक्षेचा निकाल लावला. उमेदवारांच्या मुलाखती होऊन सहा महिने झाले आहेत. मात्र अद्यापही निकाल घोषित करण्यात आला नसल्यामुळे भरती प्रक्रिया रखडलेली आहे. याप्रकरणी ‘मॅट’मध्ये आयोगाकडून योग्य बाजू मांडण्यात आली नसल्याची माहिती आहे.

एमपीएससीकडून आदिवासी विकास विभागातील वरिष्ठ संशोधन अधिकारी या ७ पदासाठी जाहिरात क्र.१५/२०२० भरती प्रक्रिया राबवण्यात आली होती. ही पदे २०१८ पासूनचे अनुशेषाची पदे आहे. अनुशेषाच्या या पदाच्या पदभरती प्रक्रियेकरिता आयोग अनास्था दाखवत आहे. वरिष्ठ संशोधन अधिकाऱ्यांच्या ७ पदांकरिता ४१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. परंतु कागदपत्रे पडताळणीमध्ये ३० विद्यार्थी अपात्र ठरले होते. यामध्ये महत्त्वाचे म्हणजे वरिष्ठ संशोधन अधिकारी या पदासाठी पदव्युत्तर पदवी समाजकार्य, समाजशास्त्र अथवा मानववंश शास्त्रामधील पदव्युत्तर पदवी अशी शैक्षणिक अर्हता ठेवण्यात आली होती.तसेच या पदास पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर आदिवासी, समाज कल्याण किंवा आदिवासी संशोधन क्षेत्रामधील ३ वर्षांच्या कालावधीचा प्रत्यक्ष अनुभव मागितला होता. परंतु उमेदवारांच्या कागदपत्रे पडताळणीमध्ये ४१ पैकी ३० विद्यार्थी हे आवश्यक पात्रता व अनुभवाचे निकष धारण करत नसल्याने आयोगाने त्यांना अपात्र ठरविले. आदिवासी विकास विभागातील ‘कास्ट व्हॅलिडिटी’मधील वरिष्ठ संशोधन अधिकारी हे जबाबदारीचे व महत्त्वपूर्ण पद आहे. राज्यात आणखी नव्याने स्थापन झालेल्या सात समितीमधील पदाची मागणी आयोगास सादर असून त्याही पदभरती प्रक्रियेबाबत साशंकता निर्माण होत आहे.

### एमपीएससीकडून बाजू मांडण्यास असमर्थ

आदिवासी विकास विभागातील वरिष्ठ संशोधन अधिकारी भरती प्रक्रिया प्रकरण ‘मॅट’मध्ये न्यायप्रविष्ट आहे. यात ‘मॅट’ने निर्देशित करून देखील एमपीएससीने गत ५ महिन्यांपासून आपले म्हणणे ‘मॅट’समोर सादर केलेले नाही. तसेच या केसच्या मागील सुनावणी दरम्यान ‘मॅट’ने आयोगास या परीक्षेचा निकाल घोषित करण्यास मज्जाव केलेला नाही तसेच निकाल राखून ठेवण्याबाबत निर्देश दिलेले नाहीत. केवळ सात पदांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणात आयोग बाजू मांडण्यास असमर्थ ठरत असून संपूर्ण भरतीकरिता आयोग पाच वर्षे एवढा कालावधी घेत आहे, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे उमेदवारांना नाहक मनस्ताप सोसावा लागत आहे. आयोगाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.




‘आदिवासी विकास विभागातील वरिष्ठ संशोधन अधिकारी पदभरती प्रक्रिया मागील पाच वर्षांपासून संथगतीने सुरू असून एमपीएससीने त्वरेने आपले म्हणणे ‘मॅट’मध्ये सादर करायला पाहिजे. ‘मॅट’च्या अंतिम निकालाच्या अधिन राहून मुलाखतीचा निकाल घोषित करावा आणि पुढील भरती प्रक्रिया विहीत कालावधीमध्ये पूर्ण करावी.

**– ॲड. प्रमोद घोडाम** संस्थापक अध्यक्ष, ट्रायबल फोरम

# प्रख्यात नामवंत गायक पदमभूषण हरी हरण, यांची गुरुकुंज आश्रमास भेट



## राष्ट्रसंतांचे कार्य जगाला प्रेरणा देणारे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०गुरु.मोझरी**

अमरावती १अखिल विश्वाला मानवतेचा संदेश देणारे व. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या महासमाधी स्थळी आज हिंदी व तेलगू चित्रपट श्रुष्टीतील प्रख्यात नामवंत गायक पदमभूषण श्री हरी हरण यांनी तिवसा तालुक्यातील व. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या गुरुकुंज आश्रमातील प्रार्थना मंदिर व महासमाधीस्थळीं भेट देऊन दर्शन घेतले.ते गेल्या दोन दिवसांपासून अमरावती शहरात कार्यक्रमानिमित्त आले असता आज दुपारी एक वाजताच्या दरम्यान नागपूरच्या दिशेने प्रस्थान करीत असतांना गुरुकुंज आश्रमातील राष्ट्रसंतांच्या महासमाधीस्थळी त्यांनी भेट दिली या दरम्यान अखिल भारतीय श्री गुरूदेव सेवामंडळाकडून शाल श्री फळ व ग्रामगीता देऊन सरचिटणीस जनार्दनपंथ बोथे, यानी शाल श्रीफळ व ग्रामगीता ग्रँथ भेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

संगीत विश्वातील पदमभूषण नामवंत गायक श्री हरी हरण यांची एकच झलक पाहण्यासाठी त्यांच्या चाहत्यांनी महासमाधीस्थळी मोठी गर्दी केली होती . यावेळी पंडित अतुल कुमार उपाध्ये, तेजस उपाध्ये, डॉ.राजारामजी बोथे, संजय देशमुख, अमोल बांबल, अरविंद राठोड, किशोर अगडे, श्रीजय चव्हाण, यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

व. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या गुरुकुंज आश्रमात आज प्रथमताच येऊन धन्य झोलो राष्ट्रसंतांनी ग्रामगीता ग्रंथातुन सांगितलेले कार्य व विचार नक्कीच प्रेरणादायी आहे

**प्रख्यात गायक पदमभूषण हरी हरण**

# स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयात ‘दिक्षारंभ’




**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.३०नांदगाव पेठ–** येथिल स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय येथे विद्यापीठ अनुदान आयोगाचा दिशानिर्देशानुसार स्टुडंन्ट इंडक्शन प्रोग्राम अंतर्गत दिक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. पंकज मोरे, प्रवेश समिती समन्वयक प्रा. राजेश ब्राम्हणे, डॉ. सुभाष पवार उपस्थित होते. दिक्षारंभाच्या पहिल्या सत्रात प्राचार्य डॉ. विजय दरणे यांनी महाविद्यालयासंदर्भात माहीती देवून प्राध्यापकाचा व शिक्षकेत्तर कर्मचा–यांचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला. प्राध्यापकांनी आपला विषय व विभागाची माहीती विद्यार्थ्यांना दिली.अभ्यासेत्तर उपक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजना, युवा महोत्सव, युवा अविष्कार, वादविवाद स्पर्धा, करीअर कौन्सील व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन या उपयुक्त उपक्रमाबद्दल विद्यार्थ्यांना माहीती देण्यात आली. महाविद्यालयातील मूलीसाठी महीला सशक्तिकरण सेलव्दारे राबविण्यात येणारे उपक्रम व मूलीकरीता असलेली तक्रार तक्रार निवारण समीती व लैंगीक छळ प्रतिबंधक समीती याची माहीती देण्यात आली. या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. सुभाष पवार यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. राजेश ब्राम्हणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा. डॉ. पी. आर. जाधव, डॉ. श्रीकांत माहुलकर, डॉ. गोविंद तिरमनवार, डॉ. सुनिता बाळापुरे, डॉ. विकास अडलोक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी ज्ञानेश्वर बारस्कर, दिलीप पारवे, विनायक पावडे, राहुल पांडे, अनिल शेवतकर, रेखा पुसदकर यांनी सहकार्य केले.

# शिवरायांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी मोठी कारवाई

## चेतन पाटील याला कोल्हापुरातून अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०कोल्हापूर–** मालवण मधील राजकोट किल्लयावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या दोन व्यक्तींपैकी चेतन पाटील यांना कोल्हापूरमधून अटक करण्यात आली आहे. सिंधुदुर्ग पोलिसांनी कोल्हापूरमधून चेतन पाटील याला ताब्यात घेतले. मालवणमधील सिंधुदुर्ग किल्लयाजवळ असलेल्या राजकोट येथे उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याने शिवप्रेमींकडून संताप व्यक्त होत आहे. तसेच या घटनेविरोधात विरोधी पक्ष आणि शिवप्रेमींकडूना आक्रमक भूमिका घेण्यात आली आहे. दरम्यान, या दुर्घटनेप्रकरणी दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा पुतळा उभारण्याचं कंत्रात मेसर्स आर्टिस्ट्री कंपनीला देण्यात आलं होतं. जयदीप आपटे हे या कंपनीचे मालक, तर चेतन पाटील हे सल्लागार आहेत. या दोघांविरोधात पुतळा कोसळल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, या प्रकरणी रात्री उशिरा कारवाई करत पोलिसांनी चेतन पाटील याच्यावर अटकेची कारवाई केली. तर चेतन आपटे हा ही दुर्घटना घडल्यापासून फरार आहे.



मालवण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होतात पसार झालेला चेतन पाटील गेल्या चार दिवसांपासून पोलिसांना चकवा देत होता. राजकोट किल्लयावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर मालवण पोलिस ठाण्यात बांधकाम सल्लागार डॉ .चेतन पाटील आणि ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हा दाखल झाल्याचे समजतात बांधकाम सल्लागार चेतन पाटील पसार झाला होता. त्याच्या अटकेसाठी सिंधुदुर्ग पोलिसांचे पथक गेल्या चार दिवसांपासून कोल्हापुरात तळ ठोकून होते. मात्र, दोन्ही मोबाईल बंद असल्याने त्याचा ठावठिकाणा लागला नव्हता. अखेर कोल्हापुरातील स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने शुक्रवारी पहाटे तीनच्या सुमारास पाटील याला त्याच्या शिवाजी पेठेतील घरातून ताब्यात घेतले. पुढील तपासासाठी त्याचा ताबा सिंधुदुर्ग पोलिसांकडे देण्यात आला.

# जिल्ह्यात पावणेसात लाख हेक्टरवरील खरीप पिके किडींच्या विळख्यात

## फवारणी परिणाम शून्य

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० मोर्शी/वरुड –** जून महिन्यात झालेल्या पेरणीनंतर निघालेली पिके साधारणतः १५ जुलैपर्यंत समाधान कारक होती. त्यानंतर १८ जुलैपासून सुरू झालेला सततचा पाऊस; तसेच जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जमिनीत व वातावरणात वाढलेल्या ओलाव्यामुळे खरीप पिकांसह संत्रा फळपिकांवर मोठ्या प्रमाणात रोग व किडींचा प्रादुर्भाव झाला आहे. परिणामी जिल्ह्यातील सुमारे ६ लाख ८२ हजार हेक्टरवरील खरीप पिके, तसेच अंदाजे ७९ हजार हेक्टरवरील संत्रा पीक रोग व किडींच्या विळख्यात सापडले आहे. अमरावती जिल्ह्यात कपाशी पिकाची सततच्या पावसामुळे वाढ खुंटली. या पिकावर पांढरी माशी, थ्रीप्स, तुडतुडे, मावा यांसह बुरशीजन्य रोग, तसेच सोयाबीनवर उंट अळी, पांढरी माशी, खोड किडी, यलो मॉझ्याक व बुरशीजन्य मुळकुजव्या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो.अतिपावसामुळे तूर पीक पिवळे पडत असून, मर रोगामुळे मुळे सडल्याने हे पीक मरत आहे. संत्रा फळपिकाची अवस्था ही यापेक्षा वेगळी नाही.



जिल्ह्यातील फळ पिकावर कोलोटोट्रीम स्टेम ॲण्ड रॉट, अल्टरनेरीया, डिप्लोडीया व मुळे कुजविणाऱ्या फायटोप्थेरा या बुरशीजन्य रोगांसह फळमाशीचा प्रादुर्भाव झाला आहे.परिणामी संत्रा फळांची मोठ्या प्रमाणात फळगळ होत असल्याचे दिसून येत आहे. शेतकऱ्यांनी रोग व किडींपासून आपले पीक वाचविण्यासाठी महागड्या बुरशीनाशकांची व कीडक नाशकांची फवारणी केली. त्यासाठी ड्रोनदेखील वापरण्यात आले. सततच्या पावसामुळे फवारणीचे परिणाम शून्य ठरले आहे.

संत्रा फळगळीची पाहणी करण्यासाठी जिल्ह्यात शास्त्रज्ञांनी दोनवेळा प्रक्षेत्र भेटी दिल्या. रोग व किडींच्या प्रादुर्भावानुसार, तालुकानिहाय परिस्थितीनुसार उपाययोजना सुचविल्या आहेत. त्या सर्व तालुका कृषी कार्यालयांकडून कृषी सहायकांद्वारे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात आल्या. शास्त्रज्ञांची टीम काही तालुक्यात सोमवारी दाखल झाली. अहवाल व उपाययोजना आल्यानंतर प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले जाईल.

**– राहुल सातपुते, जिल्हा कृषी अधीक्षक,**

# युवा स्वाभिमानच्या दहीहंडीत लाडक्या बहिणींचा जागर

## सीएम शिंदे, डीसीएम फडणवीस येणार

### नामवंत सिने कलाकार, खेळाडू उपस्थित राहणार

### रविवार १ सप्टेंबरला नवाथे चौकात भव्य आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती–** दरवर्षी प्रमाणे यंदाही युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने आ. रवीराणावमाजी खा. नवनीत रवी राणा यांच्या संकल्पनेतून भव्य विदर्भस्तरीय दहीहंडी स्पर्धा रविवार १ सप्टेंबर रोजी नवाथे चौक अमरावती येथे सकाळी १० वाजतापासून आयोजित केली

आहे. या दहीहंडीला मुख्यमंत्री देण एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री व देवेंद्र फडणवीस तसेच नामवंत या सिने कलाकार, खेळाडू उपस्थित अ राहणार आहेत.यावर्षीची दहीहंडी लाडक्या बहिणींना समर्पित असून या



भव्य दिव्यमंचावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र व फडणवीस उपस्थित राहून लाखो नागरिकांसोबत संवाद आणि गोविंदा पथकांचे मनोबल वाढवतील.या भव्य दिव्य दहीहंडीसाठी सर्व तयारी अत्यंत जोमात सुरू असून विविध समित्या कामी लागल्या आहेत. लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये देणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा भव्य दिव्य नागरी सत्कार व अभूतपूर्व स्वागत आ. रवीराणाव माजीखा.

नवनीतरवीराणायांच्या नेतृत्त्वात युवा स्वाभिमान पार्टी च्या वतीने करण्यात येईल. तरी नागरिकांनी लाखोंच्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन युवा स्वाभिमान पार्टी च्या वतीने करण्यात येत आहे

# अमरावती महापालिका हद्दीतील मंडप, पेंडॉल तपासणीसाठी पथक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती–**

जिल्ह्यातील अमरावती महानगरपालिका हद्दीमधील सार्वजनिक सण, उत्सव, समारंभ या प्रसंगी उभारण्यात येणाऱ्या मंडप, पेंडॉलच्या तपासणीकरीता तपासणी पथक गठीत करण्यात आले आहे. तरी नागरीकांनी सार्वजनिक सण, उत्सव, समारंभ या प्रसंगी उभारण्यात येणाऱ्या मंडप, पेंडॉलच्या संदर्भात कोणतीही तक्रार असल्यास तपासणी पथकातील सदस्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे. पथक याप्रमाणे उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी अनिलकुमार भटकर, दुरध्वनी क्रमांक ०७२१–२५६५०२३, मोबाईल क्रमांक ९८८१००८४९४,



ईमेल- sdo.amravati gmail.com, महानगरपालिका अमरावती झोन क्रं. ०१ सहायक आयुक्त नंदकिशोर तिखीले दुरध्वनी क्रमांक ०७२१–२६७६६२६, मोबाईल क्रं. ७०३०९२२८८९, ईमेल- tikhilenandkishor7gmail.com , राजापेठ विभाग सहायक पोलीस आयुक्त जयदत्त भवर, दुरध्वनी क्रमांक ०७२१–२६७८३००, मोबाईल क्रमांक ९९३०६०६६८९, ईमेल- acprajapeth.cpamtmahapolic.gov.in यावर संपर्क साधावा.

# केवळ ६८५ शाळाच सीसीटीव्हीच्या निगराणीत

## २,१७५ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नाहीच : जिल्हा परिषदेकडून अंमलबजावणीला सुरूवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

अमरावती जिल्ह्यात२,१८६ शाळांपैकी केवळ ६८५ शाळाच सीसीटीव्हीच्या निगराणीत आहे. तर २,१७५ शाळा सीसीटीव्ही विनाच आहे. त्यामुळे या शाळांना आता सीसीटीव्ही लागण्याकरिता एक महिन्यांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्याची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे.

बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच शाळांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची सक्ती करण्यात आली आहे.



याकरिता एक महिन्यांची डेडलाईन शाळांना देण्यात आली आहे. जिल्ह्यात २,८६१ शाळा असून यामध्ये जिल्हा परिषदेच्या १५७६ व खासगी १२८५ शाळा आहेत. यापैकी ६८५ शाळांमध्ये आधीच सीसीटीव्ही कॅमेरे लागले आहे. यामध्ये ८३ शाळा जिल्हा परिषदेच्या आहेत. तर ६०२ शाळा ह्या खासगी आहेत. परंतु २,१७५ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने या शाळांना एक महिन्यांची डेडलाईन देण्यात आली आहे. १४९३ जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये तर ६८२ खासगी शाळांमध्ये एका महिन्यांत सीसीटीव्ही लावण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे ठाकले आहे.

# ५ सप्टेंबरला होणार १६ शिक्षकांचा सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

गेल्या अनेक वर्षांपासून टळणारा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाचा मुहूर्त यंदा मात्र पाळला जाण्याची शक्यता आहेत. त्यामुळे ५ सप्टेंबर या शिक्षक दिनी जिल्हा परिषदेतर्फे १६ शिक्षकांना आदर्श शिक्षकाचा जिल्हास्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

प्रत्येक तालुक्यातून एक याप्रमाणे प्राथमिक विभागाचे १४ आणि संपूर्ण जिल्ह्यातील अपंग शिक्षकापैकी एक व माध्यमिक विभागातील एक अशाप्रकारे १६ शिक्षकांची नावे त्यासाठी निश्चित करण्यात आली आहेत. निवड झालेल्या शिक्षकांच्या नावांची ही फाईल सध्या विभागीय आयुक्तांकडे मान्यतेसाठी पाठवली आहे. दरम्यान योग्य वेळेत त्या नावांना मान्यता मिळेल, असा विश्वास जि. प.च्या शिक्षण विभागाने व्यक्त केला आहे.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातर्फे दरवर्षी ५ सप्टेंबरला शिक्षक दिनाचे आयोजन केले जाते. परंतु या कार्यक्रमात आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण मात्र केले जात नव्हते. या ना त्या कारणाने शिक्षकांची निवड लांबणीवर पडायची. त्यामुळे नंतर केव्हातरी तो कार्यक्रम आयोजित करून शिक्षकांचा सन्मान केला जात होता. गेली काही वर्षे हा कार्यक्रम त्यामुळेच दिवाळी किंवा दिवाळीच्या जवळपास पंचवटी चौकातील मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात घेण्यात आला. परंतु या वर्षी तो नेमक्या मुहूर्तावर घेण्याची तयारी सीईओ संजीता महापात्र यांनी करून घेतली आहे. त्यामुळे जि. प.च्याच डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात हाकार्यक्रम पार पडेल, अशी माहिती आहे.

### शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण



### शिक्षक संघटनांमध्ये आनंद

शिक्षकदिनी आदर्श शिक्षकांचा गौरव केला जाणार असल्याने शिक्षक संघटनांतर्फे आनंद व्यक्त केला जात आहे. एरव्ही याना त्या कारणाने टळणारा शिक्षकांचा सन्मान यंदा त्यांना शिक्षक दिनी प्राप्त होत असल्याचा मनापासून आनंद आहे, अशा भावना प्राथमिक शिक्षक समिती, प्राथमिक शिक्षक संघ व इतर संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या.

# मराठा सेवा संघाच्या वर्धापन दिनानिमित्त रविवारी खासदार बळवंत वानखडे यांच्या सत्कार; गुणवंताचाही होणार सन्मान सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

मराठा सेवा संघाच्या वर्धापन दिनानिमित्त मराठा सेवा संघ जिल्हा शाखा अमरावती वतीनेअमरावती जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार बळवंत वानखडे. यांच्या सत्कार सोबतच १० वी १२ वी. व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मराठा, कुणबी समाजातील समाज बांधवांचा गुणगौरव सोहळा रविवार दिनांक १ सप्टेंबर रोजीजिजाऊ प्रतिष्ठान मराठा नगरी रहाटगाव नागपूर रोड अमरावती येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहेवर्धापन दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन.गुन्हे शाखेचे सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे,यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षपदी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष तथा कार्यकारी अभियंता सुरेंद्र आडे यांची उपस्थिती राहणार आहेत तर विशेष सत्कारमूर्ती म्हणून UPSCमध्ये महाराष्ट्रातून प्रथम आलेला आदित्य रवींद्र साबळे सोबतच प्रमुख पाहुणे म्हणून मनपा उपायुक्त माधुरी मडावी, कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या सहायुक्त प्रांजली बारस्कर, सार्वजनिक बांधकाम विभाग यवतमाळ चे अधीक्षक अभियंता चंद्रकांत मेहत्रे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध विचारवंत हेमंत टाले, मराठा सेवा संघाचे राज्य उपाध्यक्ष अरविंद गावंडे, जिजाऊ प्रतिष्ठानचे अध्यक्ष अश्विन चौधरी, मराठा उद्योजक कक्षाचे जिल्हाध्यक्ष निलेश ठाकरे, संभाजी ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष मनीष पाटील, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष हर्षा ढोक, शिक्षक परिषदेचे नितीन कळंबे, स.सू.के.भो. संस्कृती परिषदेच्या जिल्हाध्यक्ष वैशाली चराटे इत्यादी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहेत.या कार्यक्रमाला मराठा सेवा संघाच्या आजी माजी पदाधिकारी आजीवन सभासद व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.


# कानाची सहनशीलता ७० डेसिबल; प्रत्यक्षात आवाज ११० डेसिबलपर्यंत

## अनेकांना श्रवण समस्या; जिल्ह्यात डीजेचा दणदणाट वाढला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

जिल्ह्यात सर्वच सण मोठ्याथाटात साजरे केले जातात. मंगळवारी श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी करण्यात आली. आता गणपती, नवरात्री सण साजरे होणार आहेत. यामध्ये डीजेचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. यासोबतच साधा लग्नसोहळा, घरगुती कार्यक्रम किंवा रॅली काढली तरीही डीजेचा दणदणाट दिसून येतो. याला शासनाकडून ७० डेसिबलची मान्यता असली तरीही त्यापेक्षा जादा आवाजाने डीजेचा दणदणाट सर्वत्र दिसून येतो. मात्र, यामुळे अनेकांना कानाच्या आजाराच्या समस्या उद्भवण्याची शक्यता असते. त्यामुळे डीजेचा दणदणाट असताना जाणे टाळावे, असा सल्ला कान, नाक व घसा रोगतज्ज्ञ डॉ.यांनी दिला आहे.

आता कोणताही छोटा-मोठा सण असो, घरगुती कार्यक्रम असो, सार्वजनिक कार्यक्रम वा शोभायात्रा, किंवा रॅली डीजे हमखास असतोमर्यादित डीजे वाजवायला कुणाचीही हरकत नाही. परंतु, आजच्या तरुणाईला मोठ्या प्रमाणात दणदणाट




करणारा आवाज हवा असतो. अन् त्या आवाजात ते बेभान होऊन नाचत असतात. मात्र, यामुळे अनेकांनाकानाचे आजार होण्याची शक्यता असते. तर काहींना बहिरेपणासुद्धा येऊ शकतो.

**७०डेसिबल पर्यंतचा आवाज कानासाठी सहनशील**

७० डेसिबलपर्यंतचा आवाज हा कानासाठी सहनशील आहे. मात्र त्यापेक्षा थोडातरी आवाज वाढला तर कानाला धोका होण्या शक्यता असते.

# सणांचा महिना सप्टेंबर; उत्सवांची राहणार रेलचेल

## पोळा, गौरी-गणपती, पर्युषण पर्व व ईदनिमित्त धार्मिक ऐक्याचे प्रतिबिंब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

आगामी सप्टेंबर महिना हा सण उत्सवाची मोठी पर्वणी ठरणार आहे. या महिन्यात हिंदू धर्मीयांचा बैलपोळा, गौरी, गणेशोत्सव, जैन धर्मीयांचे पर्युषण पर्व, इस्लाम धर्मीयांचा ईद असे सण साजरे केले जाणार आहेत. त्यामुळे या कालावधीत सर्वत्र उत्साह, भक्ती, चैतन्याचे वातावरण असणार आहे. तसेच सप्टेंबरमध्ये धार्मिक सद्भावना आणि ऐक्याचा संगम पाहायला मिळणार आहे.



श्रावण महिन्याचा समारोप अमावास्येला होत असून, दि. २ सप्टेंबर रोजी शेतकऱ्यांचा सर्वात मोठा सण म्हणजे बैलपोळा येत आहे. वर्षभर शेतीत खांद्यावर ओझे घेऊन काबाडकष्ट करणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता भाव व्यक्त केला जाणार आहे. यंदा पाऊसमान चांगले असून, खरिपातील पिके सुस्थितीत आहे. त्यामुळे शेतकरी आपल्याजीवाभावाच्या लाडक्या बैलांना साज चढवून धूमधडाक्यात पोळा सण साजरा करण्याच्या तयारीत आहेत.

दि. ६ सप्टेंबर रोजी हरितालिकेला महिला महादेवाची पूजा करून उपवास व धार्मिक विधी करणार आहेत. दि. ८ सप्टेंबर रोजी ऋषि पंचमीला असून, या दिवशी जैन न बांधवांकडून पर्युषण पर्व साजरा केले जाणार आहे. अभिषेक करून दि. १७ सप्टेंबर रोजी पर्युषण पर्वाचीसांगता करण्यात येणार आहे. यासोबतच दि. १६ . सप्टेंबर रोजी मुस्लिम बांधवांचा ईद ए मिलाद सण के आला असून, तो उत्साहात साजरा करण्यात येणारआहे.

**महिनाभरात सणासुदीच्या जवळपास ९ सुट्या**

सप्टेंबर महिन्यात पोळा, हरितालिका, गणेशोत्सव, ऋषिपंचमी, पर्युषण पर्व, ईद ए मिलाद या विविध धार्मिक सणांची भाविकांना मेजवानी मिळणार आहे. सप्टेंबर महिन्यात विविध धार्मिक सण व सार्वजनिक महोत्सव सलग आल्याने आणि या महिन्यात जवळपास ९ दिवस सुटी आहे. त्यामुळे सुटी, विविध सण व सार्वजनिक महोत्सवाची मेजवानी मिळणार आहे.

**लाडक्या बाप्पाच्या आगमनाची आतुरता**

दि. ७ सप्टेंबरला गणपतीची स्थापना करण्यात येणार आहे, त्यामुळे या उत्सवाची भाविकांना ओढ लागली आहे. सार्वजनिक ठिकाणी विविध गणेश मंडळांकडून ठिकठिकाणी ढोल - ताशांचा गजरात श्री गणरायाचे आगमन होणार आहे. सायंकाळपर्यंत श्री गणेशाची स्थापना करण्यात येणार आहे. या दरम्यान सलग ११ दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. दि. १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्थीच्या दिवशी गणरायाला भक्तिभावाने निरोप देण्यात येणार आहे.

# विद्यापीठातील शारीरिक शिक्षण विभागात क्रीडा दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील शारीरिक शिक्षण विभागामध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्ताने विविध क्रीडा स्पर्धांचे आय़ोजन करण्यात आले होते. मुलांसाठी व्हॉलिबॉल स्पर्धा, तर मुलींसाठी लगोरी स्पर्धा घेण्यात आल्यात. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अमरावतीचे जिल्हा क्रीडा अधिकारी श्री गणेश जाधव यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

व्हॉलिबॉल स्पर्धेत एम.बी.ए., शारीरिक



शिक्षण, होस्टल टीम, भौतिक शास्त्र, होम सायन्स, संगणकशास्त्राच्या संघाने भाग घेतला. यामध्ये होस्टेल संघ विजेता ठरला, तर शारीरिक शिक्षण संघ उपविजेता ठरला.बक्षीस वितरण समारंभाला प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर, बायोटेक्नॉलॉजी विभागाचे डॉ. प्रशांत शिंगवेकर उपस्थित होते. याप्रसंगी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री गणेश जाधव यांनी विद्याथ्र्यांना मार्गदर्शन केले. क्रीडा दिवसाबाबत विभागाच्या प्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी माहिती दिली. याप्रसंगी डॉ. हेमंतराज कावरे, डॉ. अतुल बिजवे, डॉ. विजय निमकर, श्री निलेश इंगोले, श्री सौरभ त्रिपाठी, कु. सविता बावनथडे उपस्थित होते. निशांत कुमार व आदेश राक्षे यांनी कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. संचालन कु. कल्याणी संगुवेढे, पाहुण्यांचा परिचय व आभार कु. सामा लीवा हिने मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील विविध विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत पोलीस अधीक्षक ग्रामीण कार्यालय येथे प्रशिक्षणाची संधी; ३ सप्टेंबरला मेळाव्याचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती,**

युवक, युवतींना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण कार्यालयातंर्गत विविध पदावर प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यासाठी मंगळवार दि. ३ सप्टेंबर रोजी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचा इच्छुक प्रशिक्षणार्थ्यांनी पोलीस अधिक्षक कार्यालय, अमरावती ग्रामीण येथे उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामीण पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांनी केले आहे.

प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना शैक्षणिक अहर्तप्रमाणे १२ वी पास प्रशिक्षणार्थींना ६ हजार, आयटीआय/पदवीका यांना ८ हजार व पदवीधर/ पदव्युत्तर यांना १० हजार रुपये शासनाकडून विद्यावेतन दिले जाणार आहे. या कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने असून प्रशिक्षणार्थ्यांचे वयोमर्यादा १८ ते ३५ वयोगटातील असावा. या योजनेकरीता इच्छुक उमेवारांनी hrrqt:// drive.google.bom/ f i l e / d / lvhLLv6Ya2E tk06{bbKrorw©i- {U{qln{f8ta2/ tiewa2?rr{=rharing या लिंकवरून अर्जाची प्रिंट काढुन सदर अर्ज भरून शैक्षणिक कागदपत्रासह पोलीस अधीक्षक कार्यालय, अमरावती ग्रामीण येथे उपस्थित राहावे.

अमरावती ग्रामीण कार्यालय, अमरावती येथे ३९ पदे, उपविभागीय अचलपूर येथे १९, उपविभागीय अंजनगांव येथे १०, उपविभागीय दर्यापर येथे १०, उपविभागीय अमरावती ग्रामीण येथे १९, उपविभागीय मोर्शी येथे १६, उपविभागीय चांदुर रेल्वे येथे १९, उपविभागीय धारणी येथे ७ असे एकुण पदे १३९ पदावर प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यात येणार आहेत.

**आवश्यक कागदपत्रे**

उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवास असावा, उमेदवारांची आधार नोंदणी असावी, उमेदवारांचे बँक खाते आधार संलग्न असावे, उमेदवाराने कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तलाच्या संकेतस्थळावर नोंदणी करून रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा, उमेदवारांने अर्ज भरतांना उपरोक्त ठिकाणापैकी एकाच ठिकाणासाठी अर्ज सादर करावा, सदर कार्य प्रशिक्षणाचा कालावधी उमेदवारांना या योजनेंतर्गत शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येणार आहे, एका उमेदवारस या योजनेचा लाभ एकदाच घेता येईल. उमेदवाराचे ज्या ठिकाणी प्रशिक्षणाकरीता नेमणूक केली जाईल ते मुख्यालय सोडता येणार नाही, यांची नोंद घ्यावी.

# विदर्भ पद्धतीचा बंधारा ठरला रोल मॉडेल

## आ. बच्चू कडू यांच्या संकल्पनेतील बंधाऱ्याची संपूर्ण राज्यात होणार निर्मिती : गावातील पाण्याची पातळी वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**





कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतीला मुबलक पाणी उपलब्ध होऊन त्यांना ओलीताची शेती करता यावी यासाठी नेहमी प्रयत्नरत असलेले आमदार बच्चू कडू यांच्या संकल्पनेतून अचलपूर विधानसभा मतदारसंघात विदर्भ पद्धतीच्या बंधार्यांची निर्मिती करण्यात आली आहे. अत्यंत यशस्वी ठरलेला हा विदर्भ पद्धतीच्या बंधार्याचा प्रयोग आज एक रोल मॉडेल ठरला असून राज्य सरकारने संपूर्ण राज्यात या प्रकारच्या बंधार्यांची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे.संपूर्ण मतदारसंघ हा ओलीताखाली असावा, कुठलाही शेतकरी हा कोरडवाहू शेतीवर अवलंबून राहू नये याकरिता आमदार बच्चू कडू यांनी वेगवेगळ्या संकल्पना राबविल्या असून त्यांच्याच संकल्पनेतून उदयास आलेला विदर्भ पद्धतीचा बंधारा हा एक अत्यंत यशस्वी प्रयोग ठरला आहे. सध्या ज्या भागात पाणी टंचाई उद्भवत आहे किंवा भविष्यात पाणी टंचाईला सामोरे जाण्याची शक्यता आहे तसेच ज्या ठिकाणी कॅनल ने पाणी पोहोचू शकत नाही अशा ठिकाणी कमी खर्चात, कमी मेंटेनेस मध्ये आणि भरपूर पाणी साठा उपलब्ध करून देणाऱ्या विदर्भ पद्धतीचा बंधारे बांधण्याची नियोजन आ. बच्चू कडू यांनी केले होते . अचलपूर मतदार संघातील कुरळ पूर्णा येथील पूर्णा नदीवर सर्वप्रथम आमदार बच्चू कडू यांच्या संकल्पनेतील बंधारा बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. २०१९- २०२० या आर्थिक वर्षात एन एच ए आय च्या माध्यमातून हा बंधारा अंदाजे साडे तीन कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आला. बंधार्याची संपूर्ण डिझाईन ही बच्चू कडू यांच्या संकल्पनेतील असून पूर्णत्वास आलेल्या या बंधार्यास त्यांनी विदर्भ पद्धतीचा बंधारा असे नाव दिले.

या बंधार्याची उपयोगिता सिद्ध झाली असून आज बंधाऱ्यामुळे कमीत कमी दोन किलोमीटर पर्यंत पाणी थांबून पाण्याची पातळी खोल गेलेल्या गावातील पाण्याची पातळी वाढली आहे. विदर्भ पद्धतीच्या बंधार्याचा यशस्वी झालेला प्रयोग व त्यापासून होणारे फायदे लक्षात घेत महाराष्ट्र सरकारने रोल मॉडेल ठरलेल्या या बंधार्यांची संपूर्ण राज्यात निर्मिती करण्याचा निर्णय घेत त्या प्रकारचे बंधारे बांधण्यात येत आहे .

### मतदारसंघात अनेक ठिकाणी बांधले बंधारे

विदर्भ पद्धतीच्या बंधाऱ्यांचा प्रयोग यशस्वी झाल्याचे दिसताच आमदार बच्चू कडू यांनी आपल्या मतदारसंघातील अचलपूर व चांदूरबाजार या दोन तालुक्यातील देऊरवाडा ,खांबोरा ,शिरजगाव कसबा, बेलोरा ,बेसखेडा, बोराळा, चिंचोली , वाठोंडा ब्राह्मणवाडा थडी या ठिकाणी असलेल्या नद्यांवर मृद व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून विदर्भ पद्धतीचा बंधारा बांधून शेतकऱ्यांना शेतीच्या ओलितासाठी पाणी उपलब्ध करून दिले आहे. मतदारसंघात ५३.७२ कोटीची ३६ कामे मंजूर असून ११ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली आहे. यामुळे ९०४ सघमी पाणीसाठा निर्माण होऊन ३५० हेक्टर शेती सिंचनाखाली आली असल्याची माहिती आमदार बच्चू कडू यांनी दिली.

### देऊरवाडा तीर्थक्षेत्राचे पालटले रूप

देऊरवाडा हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असून येथून वाहणाऱ्या पूर्णा नदीच्या काठी विठ्ठल रुक्मिणीचे प्राचीन मंदिर आहे. या नदीवर आमदार बच्चू कडू यांच्या संकल्पनेतील मृद व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून विदर्भ पद्धतीचा बंधारा तब्बल एक कोटी ६५ लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात आला. सदर बंधाऱ्यामुळे तीर्थक्षेत्राचे रुपडे पालटले असून रुक्मिणी विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसराला पंढरपूरचे रूप प्राप्त झाले आहे. या सोबतच परिसरातील काजळी, देऊरवाडा व अन्य गावातील पाण्याची पातळी वाढून पाण्याचे दुर्भिक्ष कमी झाले आहे. परिणामी पंचक्रोशीतील गावकऱ्यांनी आमदार बच्चू कडू यांचे आभार मानले आहे .

### पुढील ५० वर्षाच्या नियोजनाचा भाग –आ. कडू

आपला संपूर्ण मतदारसंघ हा ओलीताखाली असावा तसेच कुठलाही शेतकरी हा कोरडवाहू शेतीवर अवलंबून राहू नये याकरिता पुढील पन्नास वर्षाच्या नियोजनाचा एक भाग म्हणून मतदारसंघात विविध ठिकाणी विदर्भ पद्धतीचे बंधारे बांधून सिंचन क्षमतेत वाढ करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे .यासाठी गेल्या पाच वर्षात करोडो रुपयांचा निधी मंजूर करून आणला असून या यशस्वी प्रयोगामुळे मोठा पाणीसाठा निर्माण होऊन हजारो हेक्टर शेती सिंचनाखाली आली आहे. आर्थिक दृष्टचक्रात सापडलेला बळीराजाला थोडे आर्थिक स्थर्य प्राप्त व्हावे या प्रामाणिक भूमिकेतून आपले कार्य अव्यातपणे सुरू असल्याची प्रतिक्रिया विदर्भ पद्धतीच्या बंधाऱ्याचे जनक आमदार बच्चू कडू यांनी दिली.

# आजपासून येणार खरेदीला वेग
# म्होरके, रिंग, झुले अन् मटाटी

### सर्जा राजाच्या श्रृंगार साहित्याने सजली पोळ्याची बाजारपेठ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

शेतकऱ्यांचा सर्वांत मोठा सण पोळा असून या सणाला बैलांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली जाते. पोळा सणासाठी बैलाला साज श्रृंगार केला जातो. या सणासाठी शहरातील बाजारात लक्षवेधक म्होरके, शिंग, झूल तसेच मटाटीसह इतर साहित्य विक्रीसाठी आले आहेत. १ सप्टेंबरला असलेल्या पोळा सणासाठी सर्जा – राजा च्या–साहित्याने पोळ्याची बाजारपेठ सजली आहे. या साहित्याच्या खरेदीला शुक्रवारपासून वेग येणार आहे.अमरावती येथील बाजारपेठेत पोळ्या निमित्य सणासाठी लागणाऱ्या परंपरागत साहित्याला नावीन्यपूर्ण पद्धतीने तयार करण्यात आले आहे. त्यामुळे हे साहित्य अधिक देखणे तयार झाले आहे. त्यातून शेतकऱ्यांनाया साहित्याची खरेदी करण्याचा मोह आवरणार नाही. पोळा सणाला म्होरका प्रामुख्याने खरेदी केला जातो. त्याला लोकर, नायलॉन, वेलवेट आणि कृत्रिम फुलांच्या मदतीने तयार केलेआहे. त्यामुळे असे आकर्षक म्होरके शेतकऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहेत. हे म्होरके ६० रुपयांपासून २५० रुपये – किमतीपर्यंत बाजारात विकले जात आहे.बैलाच्या गळ्यातील पितळीचे घुंगरू महागात पडतात. यामुळे त्याला पर्याय म्हणून कंपन्यांनी प्लास्टिकच्या घुंगरांची माळ तयार केली आहे. त्याला कवड्यांच्या मदतीने आकर्षक बनविले आहे.


९० रुपयांपासून ५५० – रुपयांपर्यंतची किंमत या माळेला आहे. – यासोबतच ५० रुपयांपासून ते १०० – रुपयांपर्यंतच्या मटाटी बाजारात – विक्रीसाठी आल्या आहेत. त्यातही – वेलवेटचा वापर करण्यात आला आहे.

### विविध प्रकारचे बाशिंग

बाशिंगाचे विविध प्रकार बाजारात आहेत. लाकडी बाशिंग बाजारात आहेत. यासोबत बासिंगाला आकर्षक करण्यासाठी प्लास्टिकचा वापर करण्यात आला आहे. ४५० ते ७५० रुपये किमतीचे बाशिंग बाजारात विक्रीकरिता आले आहे. बैलाच्या पायातील पैंजण आणि त्यावर पांघरली जाणारी झूल बाजारात विक्रीसाठी आली आहे. दीड हजार ते चार हजार रुपयांपर्यंतचे दर झुलीचे आहेत. त्यात चांगल्या – कापडासह त्यावर कलाकृती आहे.

# राज्यातील जवळपास २१ जिल्ह्यांमध्ये २ सप्टेंबरपासून मुसळधार पावसाला सुरुवात होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मुंबई**



शेतकर्यांसाठी एक महत्वाची बातमी पुढे आली आहे. शेतकरी बांधवांना येत्या दोन दिवसांमध्ये शेतातील सर्व कामे उरकून घ्यावीत, असे आवाहन हवामान अभ्यासकांनी केलं आहे. कारण येत्या दोन ते सहा सप्टेंबर दरम्यान राज्यभरामध्ये जोरदार पाऊस कोसळण्याचा अंदाज हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केलाय. तसेच जायकवाडी धरण ही १००% भरणार असल्याचेही डख यांनी सांगितले आहे.

पंजाब SI यांनी आज एक हवामान अंदाज व्यक्त केला असून ज्यानुसार शेतकऱ्यांनी उसाला खत टाकणे, उडीद मूग काढून घेणे, असे कामे करून घेण्याचे सांगितले आहे. कारण राज्यातील जवळपास २१ जिल्ह्यांमध्ये २ सप्टेंबरपासून मुसळधार पावसाला सुरुवात होणार आहे. तर तो पाऊस ६ सप्टेंबरपर्यंत असणार आहे. पावसाची सुरुवात विदर्भातून होणार आहे. या पावसामुळे गोदावरी नदीच्या पाणी पातळीत वाढ होऊन ते पाणी जायकवाडी धरणात येणार आहे. सध्या जायकवाडी धरण ७० टक्के भरले असून २ ते ३ दिवसात ते ८० टक्केच्या वर जाणार असून सप्टेंबर महिन्यात शंभर टक्के भरणार आहे. त्यानंतर पाण्याचा विसर्ग करावा लागणार आहे. धरणाखाली असलेले दहा ते बारा बंधारे या मुसळधार पावसाने भरणार असल्याचे ही पंजाब डख यांनी सांगितले आहे.

### पावसामुळं पिकांच्या उत्पादनावर परिणाम होणार

सप्टेंबरमध्ये होणाऱ्या पावसामुळं सोयाबीन, मका, कापूस यासारख्या पिकांच्या उत्पादनावर परिणाम होणार आहे. तर जमिनीत ओलावा राहून खरीप हंगामातील गहू, हरभरा या पिकांना त्याचा फायदा होऊ शकतो. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, यावर्षी भारतात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. सरासरीपेक्षा देशात आत्तापर्यंत ७ टक्के पाऊस अधिक झाला आहे.

# युवा स्वाभिमान भव्य विदर्भस्तरिय दहीहंडीच्या भव्य मंचाचे विधिवत भूमिपूजन

## पोलिस आयुक्त श्री नवीनचंद्र रेड्डी यांची विशेष उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**



आमदार रवी राणा व माजी खासदार सौ नवनीत रवी राणा यांच्या संकलपनेतून रविवार दिनांक १ सप्टेंबर रोजी सकाळी ठीक १० वाजतापासून नवाथे चौक अमरावती येथे साजऱ्या होणाऱ्या या ऐतिहासिक अद्भुत अद्वितीय दहीहंडी च्या भव्य दिव्य मंचाच्या उभारणीला आजपासून सुरुवात झाली

पोलिस आयुक्त श्री नवीन चंद्र रेड्डी व उपायुक्त श्री गणेश शिंदे यांचे हस्ते पंडितजींच्या मार्गदर्शनात जागेचे शास्त्रोक्त व विधिवत पूजन करण्यात आले,या वेळी पोलीस आयुक्त श्री नवीनचंद्र रेड्डी यांनी यावेळी उपस्थितांना कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून कुणालाही त्रास होणार नाही याची काळजी घेवून शांततेने व आनंदाने हा उत्सव साजरा करावा असे आवाहन उपस्थितांना केले.

यावेळी सुनील राणा, पवन जाजोदिया, जयंतराव वानखडे, जितू दुधाने, ज्योती सयरीसे, विनोद गूहे, संदीप गुल्हाने, अजय गाडे, सचिन भेंडे, नितीन बोरेकर, शैलेंद्र कस्तुरे, अजय मोरया, संजय मूनोत, विजय थोरात, नाना आमले, पवन केशरवाणी, बाळू इंगोले, चंदू जावरे, अवि काळे, बाल्या तिडके, संजय गायकवाड, पंकज बोबडे, प्रकाश कटाने, वीरेंद्र उपाध्याय, मकसूद भाई, रोप पटेल, विजू थोरात, जितू शर्मा, पद्माकर गुल्हाने, जगदीश गुल्हाने, अर्जुन दाते, नीरज गवई, सिंधू मतलाने, लक्ष्मण लाटेकर, प्रदीप गडेकर,नितीन कनासाने, नाना आमले, अनुप अग्रवाल, अरुणा चचाने,कल्पना शर्मा, नीता खडसे, सीमा लवकर, अश्विनी ढोके, सविता नेवारे, रईसा परवीन,मुकेश गिरी, धनराज चौके, प्रशांत कावरे, प्रवीण मोकळे, कमरू उद्दीन, सद्दाम हुसेन, सुनील मेटकर, सुरज मिश्रा, गजानन बोंडे, तुषार दुधे, आकाश बडगुजर, अनिकेत देशमुख, कुशल बोबडे, सत्यम राऊत, अजय पारिसे, सुरज चेचरे, मंगेश चव्हाण, पराग चिमोटे, निलेश भेंडे, अनुप खडसे, तुषार दुधे, नितीन म्हस्के,राजूभाऊ चुणकीकर,डॉक्टर बाळापुरे, सतीश मिश्रा आदी उपस्थित होते.

# बहुचर्चित रामझुला अपघाताचा तपास 'सीआयडी'कडे हस्तांतरित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० नागपुर**



तहसील पोलिसांनी बेजबाबदार कृती केल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शुक्रवारी नागपुरातील बहुचर्चित रामझुला अपघात प्रकरणाचा तपास राज्य 'सीआयडी'कडे हस्तांतरित केला. न्यायमूर्तीद्वय विनय जोशी व वृषाली जोशी यांनी हा निर्णय दिला. परिणामी, प्रकरणातील मुख्य आरोपी रितिका उर्फ रितू दिनेश मालू (३९) यांना जोरदार दणका बसला.

या अपघातात मृत्यू झालेल्या मोहम्मद आतिफचा भाऊ शाहरुख झिया मोहम्मद यांनी यासंदर्भात याचिका दाखल केली होती. धनाढ्य महिला रितिका मालू यांनी २५ फेब्रुवारी २०२४ रोजी मध्यरात्रीनंतर दीडच्या सुमारास मद्यधुंद अवस्थेत मर्सिडिज कार चालवून मुख्य रेल्वेस्थानकाजवळच्या रामझुल्यावर मोहम्मद आतिफ व त्याचा मित्र मोहम्मद हुसैन यांना चिरडले, असा आरोप आहे. हा अपघात झाल्यानंतर तहसीलचे पोलिस उपनिरीक्षक परशुराम भावळ हे सर्वप्रथम घटनास्थळी पोहोचले होते. दरम्यान, त्यांनी आरोपी रितिका व त्यांची मैत्रीण माधुरी शिशिर सारडा यांना ताब्यात घेण्याऐवजी त्यांना पळून जाण्यास मदत केली. तसेच, एका आरोपीच्या नवऱ्यासोबत फोनवर बोलताना परिस्थिती हाताळण्याची ग्वाही दिली. पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. तहसील पोलिस निरीक्षकांना पहाटे ४.३० वाजता घटनेची तक्रार दिली होती. परंतु, त्यांनी सकाळी ९.३१ वाजता एफआयआर दाखल केला. तसेच, एफआयआरमध्ये अनेक महत्वाचे मुद्दे नमूद केले नाही. प्रत्यक्षदर्शींचे तातडीने जबाब नोंदविले नाही. आरोपींच्या रक्तात अल्कहोल सापडू नये यासाठी नमुने घेण्यासाठी सहा तास विलंब केला गेला. यासंदर्भात पोलिस आयुक्तांना तक्रार केली, पण त्यांनी काहीच कारवाई केली नाही. हे चित्र पाहता तहसील पोलिस या प्रकरणाचा पारदर्शी पद्धतीने तपास करू शकणार नाही. करिता, प्रकरणाचा तपास 'सीआयडी'कडे हस्तांतरित करण्यात यावा, असे याचिकाकर्त्याचे म्हणणे होते.

# युवक काँग्रेसने जाळला मोदी सरकारचा पुतळा

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केंद्र व राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**



मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी काँग्रेस चांगलीच आक्रमक झाली असून आज अमरावतीत युवक काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केंद्र व राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत सरकारचा प्रतिकात्मक पुतळा जाळून निषेध व्यक्त करण्यात आला. २०१४ पासून संपूर्ण भारतात भ्रष्ट्राचाराचे सरकार चालू आहे. राम मंदिर, संसद, विमानतळ असो की, संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या बांधकामातही सरकारने भ्रष्टाचार केला. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बांधकाम करण्याऱ्या व्यक्ती विरोधात तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला.